# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई
## वार्षिक अहवाल २००६-२००७
## (१ एप्रिल २००६ ते ३१ मार्च २००७)

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा इ. सन २००६-०७ सालचा वार्षिक अहवाल सादर करण्यास नियामक मंडळास अतिशय आनंद होत आहे.

### * नियामक मंडळ सभा *

नियामक मंडळाच्या एकूण ६ सभा झाल्या. या सभांना मुंबई व मुंबईबाहेरील बहुसंख्य सभासद उपस्थित होते. सभेत महत्वाचे निर्णय घेण्यात आले.

### * कार्यकारी समिती सभा *

कार्यकारी समितीचे पदाधिकारी व सदस्य कार्यपरत्वे नाट्य परिषदेच्या कार्यालयात हजर राहून निरपेक्ष भावनेने परिषदेचा कार्यभार सांभाळीत आहेत. त्यामुळे नाट्य सृष्टीच्या सर्व घटकांचा परिषदेच्या कार्यालयाशी सातत्याने संपर्क साधला जात आहे. कार्यकारी समितीच्या ८ सभा झाल्या. १४ जून २००७ चा भव्य कलावंत मेळावा व पारितोषिक वितरण समारंभ व नाट्यसंकुलाचे उद्घाटन, नाट्यसंमेलन हे परिषदेचे महत्वपूर्ण उपक्रम होय.

### * वार्षिक सर्वसाधारण सभा *

परिषदेची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि. ३१ मार्च २००७ रोजी सकाळी १०.३० वाजता परिषदेचे अध्यक्ष श्री. मोहन जोशी यांच्या अध्यक्षतेखाली अ. भा. मराठी नाट्य परिषद, यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुल, मनमाला टॅंक रोड, माहिम, मुंबई ४०० ०१६ येथे घेण्यात आली. सभेत वार्षिक जमाखर्च, अहवाल इत्यादि कार्यक्रम पत्रिकेवरील विषयांवर चर्चा होऊन विविध ठराव संमत करण्यात आले.

### * आजीव सभासद *

परिषदेची एकूण सभासद संख्या दि. ३१/०३/२००७ अखेर ११,५७९ झाली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| संस्था सभासद | १० | उपकर्ते | १७ |
| आश्रयदाते | १६ | हितचिंतक | ०८ |
| मध्यवर्ती आजीव सभासद | ३,७१८ | सन्माननीय सभासद | ११ |
| शाखा आजीव सभासद | ७,७२३ | | |

### * आर्थिक मदत *

आवश्यकतेनुसार गरजू व वृध्द कलावंतांना नाट्य परिषद आर्थिक सहाय्य करीत असते.